# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-२१३ दिनांक-३१/०५/२०२४

## " इंस्टाग्रामवरुन पिडीत महिलेशी ओळख करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन विनयभंग करणा-या आरोपीस मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेकडून अटक."

भाईंदर पोलीस स्टेशन येथे दिनांक २०.०३.२०२४ रोजी पिडीत महिलेने फिर्याद दिली कि, आरोपी नामे प्रकाश शंकर समशेर याने तिचेशी इंस्टाग्राम अकाउंटद्वारे ओळख करुन मैत्री करण्यासाठी पाठलाग करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन विनयभंग केला वगैरे मजकुराची फिर्याद दिल्याने भाईंदर पोलीस स्टेशन गुन्हा रजि. नं.१२८/२०२४ भादवि कलम ३५४, ३५४ (ड), ५०६ प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

सदरचा गुन्हा स्त्री अत्याचार व गंभीर स्वरुपाचा असल्याने मा. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचा समांतर तपास मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखा हे करीत होते. सदर गुन्हा घडलेपासुन आरोपी परागंदा झाला होता तसेच तो वेळोवेळी आपला ठावठिकाणा बदलुन वावरत असल्याने मिळुन येत नव्हता.

सदर गुन्हयाच्या घटनास्थळी मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने भेट देवुन आरोपी बाबत माहिती प्राप्त करुन गुप्त बातमीदार व इंस्टाग्रामवरील तांत्रीक विश्लेषणावरुन आरोपी हा नाशिक येथे देवळाली परीसरात राहत असल्याची माहीती मिळाली होती. त्यानुसार मध्यवर्ती गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पोलीस निरीक्षक, राहुल राख यांनी पोहवा. असीफ मुल्ला व अनिल नागरे यांना सुचना देवुन नाशिक येथे रवाना केले त्यानुसार तपासपथक नाशिक येथे जावुन आरोपीचे ठावठिकाणा बाबत माहिती प्राप्त करुन स्थानिक पोलीस स्टेशन यांचे मदतीने आरोपी नामे प्रकाश शंकर समशेर, वय २२ वर्षे रा. आंबेडकर नगर, उत्तनरोड, भाईंदर प. ता. जि.ठाणे याचा शोध घेतला असता तो नाशिक येथील देवळाली पोलीस ठाण्याचे हद्दीत मिळुन आल्याने त्यास शिताफीने ताब्यात घेवुन पुढील कारवाई करणेकामी भाईंदर पोलीस ठाणे यांचे ताब्यात देण्यात आले आहे. " इंस्टाग्राम व फेसबुक सारख्या सोशल मिडीयाचा वापर करताना महिला व तरुण मुलींनी अनोळखी इसमांशी ओळख अथवा मैत्री करताना काळजी घ्यावी "असे आव्हान गुन्हे शाखेतर्फे करण्यात येत आहे

सदरची कारवाई श्री.अविनाश अंबुरे मा.पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), श्री मदन बल्लाळ मा.सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक राहुल राख, सपोनिरी. नितीन बेंद्रे, सपोनिरी. दत्तात्रय सरक, पो.हवा मनोहर तावरे, आसिफ मुल्ला, अनिल नांगरे, पो.अं.हनुमंत सुर्यवंशी, नितीन राठोड, बि.सं.वि. सपोउपनि संतोष चव्हाण, मसुब सचिन चौधरी यांनी केलेली आहे.


मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय
मध्यवर्ती गुन्हे प्रकटीकरण कक्ष